The Resource Centre


# Maharashtra Times

**Date: 11/12/2010** **Page No: 2** **Location: Mumbai Times** **Circulation: 268614**

**Edition: Mumbai**


## Jhalak Dikhlaja



# झलक माधुरीची

**दोन** महिने आपल्या स्टाइलने अमिताभ यांनी 'केबीसी'चा चौथा सीझन सॉल्लिड हिट केला. सामान्य जनांबरोबरच सेलिब्रेटींच्या ज्ञानाची कसोटी या शोने घेतली. टॉपवर असतानाच रिटायर होण्याचा फण्डा अप्लाय करत 'केबीसी'च्या या शोने प्रेक्षकांचा निरोप घेतला. या हिट शोनंतर तेवढ्याच ताकदीचा 'झलक दिख ला जा'चा चौथा सीझन सोनी टीव्हीवर सोमवारपासून सुरू होतोय. या शोचं आकर्षण म्हणजे सबके दिलों की धडकन माधुरी दीक्षित-नेने!

माधुरी या शोचं परीक्षण करणार असून तिच्याबरोबर मलायका अरोरा खान आणि रेमो डिसूझा असतील. पहिल्या शोची विजेती मोना सिंग पुन्हा एकदा या शोचं अँकरिंग करणार आहे. यावेळी तिला साथ देणार आहे, सुमीत राघवन. या सीझनमध्ये रेणुका शहाणे, शेखर सुमन, बॉक्स अखिलकुमार, 'पवित्र रिश्ता'फेम अंकिता लोखंडे आणि सुशांत सिंग राजपूत, सिझलिंग याना गुप्ता, माही विज, गायिका अनुष्का मनचंदा, रागिणी खन्ना, कृष्णा अभिषेक, चँग हे सेलिब्रेटी स्पर्धक म्हणून एकमेकांसमोर उभे ठाकणार आहेत. तर बारावा स्पर्धक सरप्राइज आहे. या शोचा ओपनिंग एपिसोड रविवार, १२ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता सोनी टीव्हीवर पाहता येईल.



Copyright of the article is with the publication